रे.दि.मु.नं.५२/२०११
शिंदे वि. शिंदे व.

**<u>निशाणी क्रमांक ५ वर आदेश</u>**:
( पारित दिनांक : १९.१०.२०१२ )

०१. अर्ज, प्रतिज्ञापत्र नि.क्र.६, प्रतिवादी यांचे म्हणणे नि.क्र.१८ तसेच अभिलेखावरील कागदपत्रे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा, प्रतिवादी यांचेविरूध्द दावा कलम १अ ही त्यांचे मालकी वहिवाटीची आहे असे जाहीर होवून मिळणेकरिता, सदर मिळकतीतील केलेले बांधकाम म्हणजे घरमिळकत पाण्याची टाकी पाडून मिळणेकरिता तसेच हुकूमात्मक ताकीदीने कबजा मिळणेसाठी व दावा कलम १ब मधील रस्त्याच्या सुविधाधिकाराबाबत जाहीर ठरावासाठी तसेच निरंतरची ताकीद मिळणेसाठी केला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दावा कलम १ब मध्ये नमूद रस्त्याने वादीच्या जाण्यायेण्यास शांततामय वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातूर्त ताकीद मागणेसाठी केला आहे.

०२. वादी कथन करतात की, गट नं.४०५ ही मिळकत वादी यांची वडिलोपार्जित मिळकत असून गट नं.४०४ ही मिळकत प्रतिवादी यांची आहे. प्रतिवादी यांनी गट नं.४०५चे पूर्व हद्दीबाबत तंटा उपस्थित केला त्यामुळे वेळोवेळी वादीने मोजणी मागविली, ती प्रतिवादींना मान्य नव्हती म्हणून प्रतिवादी नं.१ने दि.१७.५.२०१० रोजी निमताना मोजणी मागविली. ती मोजणी दि.७.५.२०१० रोजी झाली व त्या मोजणीमध्ये दावामिळकत म्हणून १अ असे दर्शविले. ते क्षेत्र म्हणजे प्रतिवादींनी ८६.२५ चौ.मी. अतिक्रमण केल्याचे नकाशामध्ये निदर्शनास आले. त्यावर प्रतिवादींनी वरिष्ठ मोजणी मागविली नाही. परंतू अतिक्रमण काढून देवू लागू नये

म्हणून दाखविलेल्या अतिक्रमणाच्या पश्चिम बाजूस मूळ नकाशामध्ये उत्तर–दक्षिण अशी कोणतीही रेष नसताना सदर नकाशात लाल रंगाने रेष मारून तेथपर्यंत वहिवाट आहे असे खोटे कथन करून रे.दि.मु.नं. ३८/२०१० दाखल केला.

०३. वादीस अतिक्रमण काढून देवू लागू नये म्हणून प्रतिवादी यांनी त्यांचे जमिनीतून गेलेला रायगाव–महामूलकरवाडी रस्ता जुना असून त्याचा उपयोग वादी त्यांचे मिळकतीमध्ये जाण्याचा वाडवडिल भाउबंद हे पूर्वीपासून करीत आलेले असताना तसेच पश्चिमेकडे असणारा गट नं. ४०६ या क्षेत्रात जाण्या–येण्यास वापर करीत आलेले असताना प्रतिवादी यांनी रे.दि.मु.नं.३८/२०१० दाखल केलेनंतर दिनांक ३.८.२०१०चे सुमारास वादींना गट नं.४०५मध्ये जाणेस हरकत अडथळा करू लागले. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतचा दावा तसेच अर्ज दाखल करणे भाग पडले. वादी यांना सकृतदर्शी केस असून न्यायाचा तराजू देखील त्यांचे बाजूने आहे. प्रतिवादी यांना ताकीद न दिल्यास वादींचे न भरून येणारे नुकसान होणार आहे, त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

०४. प्रतिवादी यांनी आपल्या म्हणणे नि.क्र.१८कडे दाखल करून वादींची सर्व कथने नाकबूल केली आहेत. तसेच वादी गट नं.४०५ व गट नं.४०६ मध्ये जाण्यासाठी नमूद रस्त्याचा वापर त्यांचे वाडवडिल भाउबंद हे पूर्वीपासून करीत असल्याचे नाकारलेले आहे. प्रतिवादी पुढे कथन करतात की, गट नं.४०४ ही मिळकत प्रतिवादी यांचे मालकीहक्क कबजेवहिवाटीची असून लगत वादी यांची पश्चिमेस गट नं.४०५ व त्याचे पश्चिमेस रघुनाथ शिंदे यांची गट नं.४०६ अशा मिळकती आहेत. या तीनही गटांचा मूळ सर्व्हे नं.२५३ असा होता. एकत्रिकरणाच्या वेळी सर्व्हे

नं.२५३/१चा गट नं.४०६, सर्व्हे नं.२५३/२चा गट नं.४०५ व सर्व्हे नं. २५३/३चा गट नं.४०४ असे गट नंबर पडले. जमीन गट नं.४०५चे उत्तरेस लगत गावठाणातील मुख्य रस्ता पूर्व—पश्चिम असा आहे. रस्त्यालगत वादीने गट नं.४०५ मध्ये घर बांधलेले आहे. गावठाणातील रस्त्यापासून गट नं.४०५ मध्ये ये—जा करण्यास पूर्वांपार खुली जागा होती व आहे. वादीने दावामिळकत १ब मध्ये नमूद केलेप्रमाणे रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता व नाही तसेच गट नं.४०६ या मिळकतीचा उपभोग घ ोणेसाठी गट नं.४०४ मधील रस्त्याचा वापर करीत असलेबाबत मजकूर काल्पनिक आहे कारण गट नं.४०६चे लगत पश्चिम दक्षिणोत्तर मुख्य गावठाणापासून ते महामूलकरवाडीसाठी पूर्वीचा रस्ता होता, तो आजही ओढयापर्यंत अस्तित्वात व वापरात आहे. सदरची बाब वादी यांनी दडवून ठेवली आहे.

०५. प्रतिवादी पुढे कथन करतात की, दावामिळकत १क मधील गट नं.४०५ पैकी ८३.५ चौ.मी सोडून बाकी उरलेल्या मिळकतीबाबत या वादीने ताकीद मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, या प्रतिवादीने वादी यांचेविरूध्द रे.दि.मु.नं.३८/२०१० ताकीदीचा दावा दाखल करून त्यामध्ये नि.क्र..५ कडे जो अर्ज दिला त्या अर्जामध्ये ज्या भागास या वादीविरूध्द कोर्टाने तूर्तातूर्त ताकीद मंजूर केली तसेच ताकिदीचा हुकूम वरिष्ठ न्यायालयामध्ये रे.कि.दि.अ.नं.१९६/२०१० कायम झालेला आहे, त्यामुळे त्याच दावामिळकतीसंदर्भात वादी यांना सदरचा दावा दाखल करून प्रतिवादी यांचेविरूध्द ताकीद मागता येणार नाही. प्रस्तुत वादीने रे.दि.मु.नं.३८/२०१० मध्ये नि.क्र.१८कडे अर्ज देवून मागणी केली होती तोही अर्ज गुणावगुणावर चालून दिनांक ३०.१०.२०१० रोजी नामंजूर झालेला आहे. त्याविरूध्द वादीने तक्रार

केलेली नाही. सदरची वस्तुस्थिती वादीने लपवून ठेवली आहे. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह रद्द करणेत यावा.

०६. खालील मुद्दे माझ्या पडताळणीस असल्यास त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे :—

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १. वादी तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे काय? | .. सकारात्मक |
| २. काय हुकूम ? | .. अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

: **कारणमिमांसा** :

०७. **मुद्दे क्रमांक १ व २ करिता** :—

प्रतिवादी यांनी, अशाच प्रकारचा अर्ज रे.दि.मु.नं.३८/२०१० मध्ये प्रस्तुत वादी यांनी दिलेला असल्याबाबत आक्षेप घेतल्याने रे.दि.मु.नं. ३८/२०१० मधील कागदपत्रांचे देखील अवलोकन केले.

०८. प्रतिवादी यांनी रे.दि.मु.नं.३८/२०१० मधील दावा परिशिष्ठ अ नकाशात तांबडया शाईने दाखविलेल्या भागाचे पश्चिमेकडील गट नं. ४०५चे वादीचे कबजे वहिवाटीस हरकत अडथळा करणार नसल्याबाबत पुरशीस दाखल केलेली आहे, त्याप्रमाणे त्यावर वादींचे कबजेवहिवाटीस प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत हरकत अडथळा करू नये असा आदेश दि.१७.४.२०१२ रोजी झालेला आहे.

०९. रे.दि.मु.नं.३८/२०१० मधील नि.क्र.१८चे अवलोकन करता, त्यामध्ये गट नं.४०४ मधून गेलेल्या रस्त्याचा वापर गट नं.४०५ मध्ये जाणेकरिता त्या दाव्यामधील प्रतिवादी यांना त्या दाव्यामधील वादी यांनी हरकत अडथळा केला याबाबत आक्षेप नाही. प्रस्तुतच्या अर्जात रस्त्याच्या वापरास प्रतिवादींनी हरकत अडथळा केलेबाबत वादीने कथन केले आहे. त्यामुळे रे.दि.मु.नं.३८/२०१० मधील नि.क्र.१८, त्यावरील आदेश याची बाधा, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास वेगळे कारण घडले असल्यामुळे येणार नाही.

१०. प्रतिवादी गट नं.४०४, ४०५, ४०६ चा पूर्वीचा मूळ सर्व्हे नं. २५३ असल्याचे मान्य करतात तसेच त्यांचे गट नं.४०४ मधून महामूलकरवाडी—रायगाव असा रस्ता गेलेला असल्याबाबत मान्य करतात. वादी यांचे कथन की, सदर महामूलकरवाडी—रायगाव रस्त्याव्यतिरिक्त वादी यांना गट नं.४०५ची वहिवाट करणेसाठी दुसरा रस्ता नाही. याउलट प्रतिवादी यांचे कथन की, वादी यांना गट नं.४०५चे उत्तर बाजूस गावठाणापासून वहिवाट करणेसाठी रस्ता आहे.

११. वादी प्रतिवादी यांनी परस्परविरोधी कथने केल्याने निशाणी क्र. १ वरील आदेशाप्रमाणे ॲडव्होकेट कोर्ट कमिशन नेमण्यात आले. कोर्टकमिशनर यांनी दाखल केलेला अहवाल फोटोग्राफस् नकाशासह तसेच त्यावर दाखल केलेले वादी प्रतिवादी यांचे म्हणणे यांचे एकत्रित अवलोकन करता, महामूलकरवाडी—रायगाव रस्त्यापासून गट नं.४०५चे पश्चिम बाजूकडील बांधापर्यंत पूर्वपश्चिम पायवाट असल्याचे व पायवाटेचे दक्षिण बाजूस एक पुसटशी मळलेली चाकोरी दिसत आहे. तसेच चाकोरी पायवाटेस समांतर असल्याचे अहवालात नमूद आहे. गट

नं.४०५चे उत्तर बाजूस वादीचे घर असल्याचे व त्यापुढे रायगाव गावातून येणारा पूर्वपश्चिम रस्ता असून त्याची रूंदी १० फूट असल्याचे नमूद आहे. सदरचा रस्ता वादीचे घराच्या उत्तर बाजूकडून असल्याचे नमूद आहे तसेच वादीचे घरासमोरील रस्ता वादीचे घराच्या पश्चिमेस असणारे घराकडे निमुळता होवून बोळाएवढाच उरलेला आहे. वादीचे घरासमोरील रस्त्याच्या उत्तरेस पूर्व—पश्चिम अशी घरे असून एकमेकास लागून आहेत असे अहवालात नमूद केलेले आहे. गट नं.४०५च्या उत्तर बाजूने गट नं.४०५ मध्ये जाणेसाठी रस्ता असल्याचे अहवालात नमूद नाही.

१२. युक्तिवादादरम्यान वादी यांचे विधिज्ञ यांनी, हिंदू लॉ मधील कलम ३०३चा आधार घेतला आहे. त्यामध्ये, रस्त्याच्या वापराबाबत हक्क फक्त एखादया व्यक्तीस असलेबाबत पुरावा नसल्यास रस्त्याचा वापर एकत्रित असल्याचे गृहीत धरले जाते असे नमूद आहे. सुविधाधिकार कायदा कलम १३ अन्वये, *सुविधाधिकार जर एका व्यक्तीच्या हिश्यात गेला असेल आणि तो दुस—या व्यक्तीच्या हिश्याच्या वापराकरिता आवश्यक असेल तर दुसरी व्यक्ती सुविधाधिकारास पात्र असते.* गट नं.४०४ व ४०५ यांचा पूर्वीचा सर्व्हे नं.२५३ असल्याने जरी रायगाव—महामूलकरवाडी रस्ता प्रतिवादींच्या गट नं.४०४ मधून गेलेला असला तरी वादी यांच्या रस्त्याचा वापर करण्याचे हक्कास प्रतिवादी यांना हरकत अडथळा करता येणार नाही.

१३. गट नं.४०४ मधून गेलेल्या रायगाव—महामूलकरवाडी रस्त्याचा वापर वादी करीत नसल्याचे प्रतिवादी कथन करतात तसेच वादी यांना त्यांचे गट मिळकतीची वहिवाट करण्यासाठी वेगळा रस्ता असल्याचे

सकृतदर्शी दिसत नसल्याने वादी यांना सकृतदर्शी केस आहे तसेच रस्त्याचा वापर करण्यापासून वादी यांना वंचित ठेवल्यास त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे न्यायाचा तराजू देखील वादी यांचे बाजूने आहे. वादी यांना रस्त्याचा वापर करण्यास परवानगी दिलेस प्रतिवादी यांचे नुकसान होणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ला सकारात्मक उत्तर देवून मुद्दा क्रमांक २च्या उत्तरास खालील आदेश पारित करीत आहे :—

## आदेश

१. अर्ज निशाणी क्रमांक ५ मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी, त्यांचे नोकर, प्रतिनिधी अगर त्यांचेतर्फे कोणीही इसमांनी दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा कलम १ब मध्ये नमूद रस्त्याने वादीच्या गट नं.४०५मध्ये वादीचे जाण्यायेण्यास हरकत अडथळा करू नये अशी त्यांना तुर्तातूर्त ताकीद देण्यात येत आहे.

३. खर्चाचा हुकूम अंतिम निकालाच्या वेळी केला जाईल.

मेढा

दिनांक: १९.१०.२०१२　　(वैभव चिं. जोशी)
दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,मेढा